**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू वासुदेव उकिडवे
बी-१०/३, रामबाग कॉलनी,
पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सभापती,
महाराष्ट्र पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि.,
नवी पेठ, पुणे-३० उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज
को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू वासुदेव उकिडवे
बी-१०/३, रामबाग कॉलनी,
पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा सभापती,
महाराष्ट्र पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि.,
नवी पेठ, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज
को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>महाराष्ट्र पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३० सोसायटीच्या रामबाग वसाहतीतील गाळाधारक इमारत क्र.४ ते १० इमारती पूर्ण झाल्यावर पुणे महानगरपालिकेने मंजूर केलेले नकाशे(ले-आऊटसह) व इतर बाबी. | |

## विवेचन

महाराष्ट्र पी.डब्ल्यू.डी.एम्प्लॉईज को-ऑ.हौसिंग सोसायटी लि., नवी पेठ, पुणे-३० या संस्थेच्या रामबाग वसाहतीमधील इमारतींच्या पुणे महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशाच्या प्रती व इतर बाबींची माहिती अपीलकर्ता श्री.विष्णु वासुदेव उकिडवे यांनी संस्थेकडे मागितली होती. आपल्या गृहनिर्माण संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही, असे संस्थेचे सभापती श्री.एस.एच.जोगळेकर यांनी त्यांनाकळविले. त्यावर श्री.उकिडवे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे आदेश संस्थेला दिल्यानंतरही आपल्याला माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.उकिडवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या दि.१८.३.२००८ रोजी अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यामध्ये एकमत न झाल्यामुळे दि.२१.५.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

या गृहनिर्माण संस्थेला इमारत बांधण्यासाठी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ(एमएसएफसी) यांच्यामार्फत कर्ज मिळालेले असल्यामुळे अप्रत्यक्ष मदत सरकारकडून झालेली आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संस्थेला लागू होतो, असे प्रतिपादन श्री.उकिडवे यांनी केले. मात्र संस्थेने पाच ठिकाणी घेतलेल्या जमिनी संस्थेच्या निधीतून घेतल्या असून त्या विकसीत केल्या. संस्थेच्या स्थापनेला ४७ वर्षे झाली आहेत. सभासदांनी आपल्या खर्चाने बांधकाम केले. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून केवळ सभासदांच्या जरुरीपुरते कर्ज घेण्यात आले आहे. परंतु त्या त्या सभासदांना मिळालेले ते कर्ज होते व त्यांनी त्याची पूर्ण परतफेड करुन व्यवहार पूर्ण झाल्यालाही २० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे, असे संस्थेचे सचीव श्री.वा.पां.गोखले, सभापती श्री.एस.एच.जोगळेकर व संस्थेतर्फे वकील श्री.बी.बी.शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच संस्थेची कोणतीही कागदपत्रे पाहू देण्याची व योग्य ते शुल्क घेऊन प्रती देण्याची पध्दत गेल्या ४० वर्षापासून संस्था राबवीत आली आहे. सर्व पदाधिकारी ज्येष्ठ नागरिक (पंच्याहत्तरीच्या पुढचे) असून सामाजिक भावनेतून कामे करीत आले आहेत, असेही त्यांनी नमूद केले. श्री.उकिडवे व माहिती मिळत नसल्याची तक्रार करणारे अन्य सभासद श्री.म.वि.कुबेर हे दोघेही संस्थेचे ज्येष्ठ सभासद आहेत. अपीलकर्ता यांनी मागणी केलेले सर्व अभिलेख १९६५ च्या दरम्यानचे आहेत. संबंधित सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्याची तयारी संस्थेने दर्शविली होती. त्याप्रमाणे ते कधीही कागदपत्रे पाहू शकतात. महानगरपालिकेत जाऊन संबंधित अभिलेख पाहण्याचे ठरले तर त्याचा खर्च देण्याचीही संस्थेची तयारी आहे, मात्र वयोमान व मनुष्यबळ यांच्या अडचणीमुळे आपण ते करु शकणार नाही, असे संस्थेचे सचीव श्री.वा.पां.गोखले, सभापती श्री.एस.एच.जोगळेकर व संस्थेतर्फे वकील श्री.बी.बी.शिंदे यांनी सांगितले.

वरील संदर्भ लक्षात घेता संस्था माहिती देण्यास तयार नाही, असे दिसत नाही. सर्व अधिकारी ७५ वर्षे वयापुढील आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू

होतो की नाही, याचा निर्णय त्या त्या संस्थेच्या संदर्भातील तपशिलावरुनही करावा लागेल. संदर्भित संस्थेला हा अधिनियम लागू होत नसल्याचे संस्थेचे प्रतिपादन रास्त आहे. मात्र महापालिकेकडील अथवा सहकार खात्याकडील माहिती संस्थेने मागवून आपलया सभासदांना देणे शक्य आहे. त्यानुसार संस्थेतर्फे महानगरपालिकेकडे अर्ज करुन माहिती मागविण्याचे संस्थेचे सभापती श्री.एस.एच.जोगळेकर व सचीव श्री.वा.पां.गोखले यांनी मान्य केले.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.१०.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. रविंद्र नामदेव तारू, उदयविहार, मु. लौजी, पो. जगदीशनगर, ता. खालापूर, जि. रायगड यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२५ / सातारा | तलाठी लिंब, ता.जि.सातारा | उपविभागीय अधिकारी, सातारा उप विभाग सातारा जि. सातारा | मौजे लिंब, ता. सातारा येथील जुना स.नं.१००५अ, नवा सर्व्हे नं.९०६ /२अ, व ९०६/२क ह्या मधील वारस नोंदी बाबतची माहिती व प्रती मिळणेबाबत | अपीलकर्त्याची चुकीच्या कार्यवाही बद्दल कार्यवाहीची मागणी आहे. मूळ अर्जातील मागणीप्रमाणे मुदतीत माहिती दिल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.<br>अपीलकर्त्याच्या मागणी प्रमाणे नुकसान भरपाई व कायदेशीर कार्यवाही करणेसाठी वरिष्ठ स्तरावरून निर्णय /आदेश प्राप्त करणे क्रमप्राप्त आहे.<br>अपीलकर्त्यास मागितलेली माहिती प्राप्त झालेली आहे. कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.१०.२००८**

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्त्या सौ. मंगल श्रीरंग महाडिक, रा. २१, सागर हौसिंग सोसायटी, एमआयडीसी, कोडोली, ता. जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२७ / सातारा | शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, जि. कोल्हापूर | शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, जि. कोल्हापूर | श्री. सुरेश रघुनाथ काकडे यांच्या प्रतिनियुक्तीवरील सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरली तर आमची का धरली जात नाही ? त्याच निर्णयाप्रमाणे मागणी मान्य करावी. | दि. २१.८.२००८ रोजी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यां तीनही घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार एकत्रित विचार करून नियमातील तरतुदीनुसार योग्य तोडगा काढण्याचे ठरले. मूळ मागणीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** १४.१०.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २२.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. शाम आबा अहिवळे, १५अ, मंगळवार पेठ, फलटण, जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २२९ / सातारा | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., फलटण शहर, उपविभाग जि. सातारा | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., फलटण शहर उपविभाग, जि. सातारा | फलटण शहरातील कोणत्या व्यक्ती चोरून वीज वापरतात त्यांची सन २००१ ते २००७ पर्यंतची नावे व पत्ते यांची साक्षांकित यादी व तद्अनुषंगाने एकूण चार मुद्दयां बाबतची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. अपीलकर्त्यास माहिती दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८.१०.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३+१६३+१६४+२६६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी<br>मु.पो. कुर्डूवाडी, श्रीदत्त रोड, ता. माढा,<br>जि.सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. हुकूमचंद हरिलाल भलाणी यांनी अनुक्रमे दि. ७.४.२००६, दि.१०.३.२००६, दि.१४.२.२००६ व दि. १.४.२००६ च्या अर्जान्वये सी.एल.३ अनुज्ञाप्ती क्रमांक ६२ मध्ये घडलेले गैरप्रकार, नियमबाह्य कृत्य, कायदेशीर वारसांबाबत शासनाकडे केलेल्या लेखी तक्रारीचे काय झाले, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी इत्यादी माहिती मागितली होती.

अनुज्ञाप्ती सी.एल. ३ क्रमांक ६२ ही मनिष महेंद्रकुमार भलाणी यास सुरु करण्यास दि. ३१.३.२००६ अखेर तात्पुरती परवानगी देण्यात आली असून वारसांसाठी सदर प्रकरण तालुका न्यायालयात दावा क्र.३०६/२००५ दि. २२.८.२००५ नुसार प्रलंबित आहे व इतर मुद्दयांबाबतची माहिती वेळोवेळी पाठविण्यात आली आहे. तसेच अपीलकर्ता वारंवार तीच माहिती मागत आहेत, दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान होत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांनी त्यांचे निवेदनात पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अनुज्ञाप्ती सी.एल. ३ क्रमांक ६२ ही दिवंगत श्री. महेंद्रकुमार हरिलाल भलाणी व श्री. नरेंद्र कृष्णलाल व्होरा यांच्या भागीदारीत होती. भागीदार श्री. भलाणी व अपीलकर्ते हे भाऊ आहेत. भावाच्या मृत्यूनंतर सदर अनुज्ञाप्ती आपल्या नावावर व्हावी, हा अपीलकर्त्याचा उद्देश आहे, असे वरील सर्व

बाबींचा विचार करता, तसेच सादर केलेली निवेदने व कागदपत्रे यावरून दिसून येते. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील चारही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १२ .९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २३४२ / पुणे | श्री. भूषण चंद्रकांत ताईतवाले रा. शिवनेरी गणपती मंदिरामागे, शास्त्री चौक, आळंदी रोड, भोसरी,ता.हवेली, जि. पुणे | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. २, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ निम्नस्तर व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे ग्रामीण, पुष्पमंगल इमारत, बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३८ | मौजे भोसरी ता.हवेली, येथील स.नं.२०२ हिस्सा नं.३अ पैकी २ आर बाबत खरेदी दस्त व दस्त नंबर ११४००/८६ दि.१९.९.२००८ ची मूळ प्रत व सत्य प्रत मिळणेबाबत |
| २ | २३९५/ पुणे | श्री. भूषण चंद्रकांत ताईतवाले | गाव कामगार तलाठी, भोसरी, ता.हवेली, जि.पुणे | मंडल अधिकारी, भोसरी, ता.हवेली, जि. पुणे | मौजे भोसरी, ता. हवेली येथील स.नं. २००२/३अ पैकी २ आर जमिनीचे अ पत्रक दस्त नंबर ११४००/८६ दि. २९.९.१९८६ च्या 'अ' पत्रकाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या सत्यप्रती मिळणेबाबत |
| ३ | २४००/ पुणे | श्री. प्रेमनाथ ननकू यादव, रा. मिलीटरी डेअरी फार्म, खडकी, पुणे-१७ | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय वडगाव मावळ, जि. पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ बाबत दस्त नं. ४४८१/२००२ चे 'अ' पत्रक मिळाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. |
| ४ | २३९९/ पुणे | श्री. सुखपतीदेवी राजेंद्र प्रसाद पांडे रा. डेअरी फार्म, खडकी, पुणे-३ | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय वडगाव मावळ, जि. पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ बाबत दस्त नं. ३०८७/२००१ चे 'अ' पत्रक प्राप्त झाल्यापासून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २३९६+ २३९७/ पुणे | सौ. मेरी कट्टी शाम्युअल रा. मिलीटरी डेअरी फार्म, खडकी, पुणे-३ | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय वडगाव मावळ, ता. वडगाव-मावळ, जि. पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.२२३/१/१ चे 'अ' पत्रक दस्त नं. ४५२४/२००२ वर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. |
| ६ | २४०१/ पुणे | श्री. सी. एम. शाम्युअल | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय वडगाव मावळ, ता. वडगाव मावळ, जि. पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ चे 'अ' पत्रक दस्त नं. ४४८२/२००२ वर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. |
| ७ | २४०२ + २४२३ + २४२४ / पुणे | श्री. निवृत्ती प्रभु कांबळे रा. मिलीटरी ग्रास फार्म, स्टाफ क्वार्टर नं.पी. २७/१, एम.जी.रोड, खडकी, पुणे-३ | गाव कामगार तलाठी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ चे 'अ' पत्रक दस्त नं. ४५२५/२००२, व ३०८५/०१ प्राप्त झाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती. |
| ८ | २४०३/ पुणे | श्रीमती कमलेश यादव रा. मिलीटरी डेअरी फार्म, खडकी, पुणे-३ | गाव कामगार तलाठी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ बाबत दस्त नं. ३०८६/२००१ चे अपत्रकावर करण्यात आलेली कार्यवाही. |
| ९ | २४०४ + २४०५/ पुणे | श्री. रामसिंग खुद्दीलाल यादव रा. डेअरी फार्म, खडकी, पुणे-३ | गाव कामगार तलाठी तळेगाव-दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मंडल अधिकारी तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ बाबत दस्त नं. ३०४४/२००१ चे अ पत्रक मिळाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती |
| १० | २३९८/ पुणे | श्री. प्रकाश मुळचंद आदिवाल रा. डेअरी फार्म, खडकी, पुणे-३ | गाव कामगार तलाठी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मंडल अधिकारी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे | मौजे तळेगाव दाभाडे येथील स.नं.३२३/१/१ बाबत दस्त नं. ३०९१/२००२ चे अ पत्रक मिळाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | २४०७+ २४०७अ / पुणे | श्री. राजेंद्र कृष्णाजी देवळे द्वारा पाटील ५८७, बुधवार पेठ, पाटील सदन, पुणे-२ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र. ८, पुणे | सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,पुणे शहर-५, फायनान्स रोड, पुणे-१ | मौजे मोशी, ता.हवेली जुना स.नं.४७, ४८ चा नवीन नं.४५८ क्षेत्र ००.०२ आर बाबत खरेदी दस्त नंबर १०२१/५७/७७ ते ८३ (अ.क्र.१२०९/९२) या दस्ताची मूळ प्रत मिळणेबाबत |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्यांच्या अतिकृततेविषयी साशंकता निर्माण होते. तसेच 'कार्यवाहीची माहिती' मागितली असली, तरी कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत नाही. हे लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** १८.१०.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**क्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**र अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५० / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हरी आप्पा प्रक्षाळे<br>मु.पो.ता.पंढरपूर, म्हसोबा मंदिर समोर,<br>वीटभट्टी जवळ, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अधीक्षक, नवरंग बालकाश्रम, पंढरपूर, जि.सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मानद कार्यवाह, बॉम्बे प्रार्थना समाज,<br>गिरगाव, मुंबई-४०० ००४ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. हरी आप्पा प्रक्षाळे यांनी नवरंगे बालकाश्रम संस्थेला शासकीय अनुदान किती मिळते व त्याचा विनियोग कशा प्रकारे केला जातो, सन २००३ ते २००६ लेखापरीक्षण अहवाल, प्रति मुलास महिना अनुदान रक्कम, संस्थेस शासकीय अनुदान स्वरूपात आर्थिक मदत मिळाली काय, असल्यास ती किती, इत्यादी स्वरूपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर यांच्याकडे मागितली होती. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १९.६.२००८ रोजी सर्व माहिती मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ११ .९.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,.
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४ / सातारा | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. महादेव गुंडा वासोळकर,<br>रा.सर्व्हे नं.२०३, शिवकृपा पेपर मिल समोर,<br>एमआयडीसी, वाई, ता. वाई, जि. सातारा | हजर |
| ३ | जा माहिती अधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाई<br>जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्र. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा<br>जिल्हा परिषद, सातारा | हजर |
| ५ | मूळ अर्जातील<br>माहितीची मागणी<br>(संक्षिप्त) | वाई तालुक्यातील अनुसूचीत जमाती मधील (आदिवासी )<br>शेतकऱ्यांची यादी | |

अपीलकर्त्याची मूळ अर्जातील मागणी वाई तालुक्यातील अनुसूचित जमाती मधील (आदिवासी ) शेतकऱ्यांची यादी मिळण्याबाबतची आहे. १. शासकीय परिपत्रकाची अंमलबजावणी जाणून बुजून न करणे २. खोटी व चुकीची माहिती शासनास सादर करणे ३. ढिसाळ प्रशासन अधिकाऱ्यांची मनमानी, आदेश न मानणे, खोटी, चुकीची माहिती देणे ४. अनुसूचित जमातीमधील शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक निर्णय, शासकीय सवलतीपासून वंचित ठेवणे इत्यादी कारणे अपीलकर्त्याने आयोगाकडील अर्जात नमूद केली आहेत.

वाई तालुक्यातील अनुसूचित जमाती मधील (आदिवासी ) शेतकऱ्यांची यादी पंचायत समिती कार्यालयात नसल्याचे अपीलकर्त्यास मुदतीत कळवूनही त्यांचे समाधान होत नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याची मूळ अर्जातील मागणी व अपिलात नमूद केलेली कारणे यात तफावत आहे. मूळ अर्जातील मागणीनुसार अपीलकर्त्यास मुदतीत उत्तर दिलेले आहे. वाई तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे सर्व्हेक्षण करणेत आलेले नसल्याने यादी देता येत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २८.१०.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.८.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. तुकाराम बाबुराव जाधव, रा. कर्मवीरनगर, पो. एमआयडीसी, सातारा ता. जि. सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा/ २८९ | निवासी नायब तहसीलदार, खटाव, जि. सातारा | तहसीलदार, खटाव, जि. सातारा | मौजे म्हासूर्णे ता. खटाव, येथील फेरफार नं.२७७९ संबंधी व इतर एकूण ११ मुद्दयां बाबत | अपीलकर्ता गैरहजर. उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास वेळेत दिली आहे. वर्ग -ड ची कागदपत्रे नष्ट केलेली असल्याने देता येत नसल्याचे कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७ .१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १८.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | २४८ + ५५७ + २४६ + ४२२ / सोलापूर |
|---|---|---|
| १ | अपीलकर्ता | श्री. सुभाष भिमराव गावसाने<br>मु.पो.साकत, ता.बार्शी, जि. सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकारी | १. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर<br>२. कक्ष अधिकारी, पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर |

| अपील क्रमांक | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | उपस्थिती |
|---|---|---|
| २४८/ सोलापूर | श्री. चांगदेव सोपान वाघ, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांच्या जन्म तारखे बाबत व सेवापुस्तक नक्कल मिळणेबाबत. जन माहिती अधिकाऱ्यांनी काही माहिती दिली. श्री. वाघ शाळेत दाखल झाल्याची तारीख २६.७.१९४६ असून त्यावेळची माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. | अपीलकर्ता गैरहजर |
| ५५७/ सोलापूर | श्री. चांगदेव सोपान वाघ, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक यांच्या जन्मनोंदीमध्ये केलेल्या गैरप्रकारात जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई केली | "-" |
| २४६ / सोलापूर | ग्राम शिक्षण समिती साकत, ता. बार्शीच्या नेमणुकीबाबतची माहिती | "-" |
| ४२२ / सोलापूर | दि. ९.१.२००७ रोजी दाखल केलेल्या तीन अपिलांच्या सुनावणी बाबत | "-" |

अपीलकर्ता श्री. सुभाष भिमराव गावसाने यांनी ग्रामपंचायत, साकत संबंधी माहिती मागितली होती. दि. १८.६.२००८ रोजी आयोगाने सोलापूर येथे आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' दिवशी श्री. गावसाने यांनी आजारी असल्यामुळे हजर राहू शकत नसल्याचे दि. १६.६.२००८ रोजी कळविले. त्यांनी निवेदनाद्वारे लेखी म्हणणे सादर केले असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच दि. १७.५.२००८ रोजी सादर केलेले निवेदन व कागदपत्रे यावरून आदेश होण्याची विनंती केली आहे.

अपिलांमधील कागदपत्रे पहाता उपलब्ध माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त लेखी नमूद केले आहे. माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अपीलकर्ता यांनी निवेदनात म्हटले आहे. मात्र त्याबाबतचे पुरावे दाखल केलेले नाहीत.

अपील क्र.४२२ मध्ये अपीलकर्ता यांनी स्वत: केलेल्या अपिलांची नक्कल मागितली आहे. ही 'माहिती ' मागण्यात सार्वजनिक हिताचा कोणताही विषय नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा गाभा लक्षात घेता त्याच्याशी सुसंगत असा हा कायद्याचा वापर नाही. मात्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानीही अर्जांची हाताळणी अधिक दक्षतेने व विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. उभय बाजूंना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** २२.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**